# LIBRARY & INFORMATION CENTRE

## GIT in NEWS

**Sakaal 05-11-2015**

# जीआयटी रोटरॅक्ट क्लब अध्यक्षपदी नचिकेत धामणकर




बेळगाव : रोटरॅक्ट पदग्रहण समारंभात नचिकेत धामणकर याने रोटरॅक्टच्या कार्याची माहिती दिली.

बेळगाव, ता. ४ : गोगटे तांत्रिक महाविद्यालयातील (जीआयटी) 'शुभारंभ' हा रोटरॅक्ट क्लबचा पदग्रहण समारंभ नुकताच पार पडला. जीआयटी रोटरॅक्ट क्लब अध्यक्ष म्हणून नचिकेत धामणकर, सचिव म्हणून समीर अंबेकर यांनी पदग्रहण केले. इन्स्टॉलिंग अधिकारी म्हणून रोटरी जिल्हा प्रांतपाल श्रीनिवास मालू होते.

जीआयटीच्या सुवर्णमहोत्सवी सभागृहात हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी रोटरी इ-क्लबचे अध्यक्ष तसेच जीआयटीचे प्राचार्य डॉ. ए. एस. देशपांडे होते. रोटरीचे सहायक प्रांतपाल सतीश कुलकर्णी, जीआयटी प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष यु. एन. कालकुंद्रीकर यांनी या वेळी मार्गदर्शन केले. जीआयटी रोटरॅक्ट क्लबच्या वेबसाईटचे अनावरण केले. या वेळी दत्तक शाळांच्या मुलांना साहित्याचे वाटप झाले. इ-रोटरी क्लबच्या सचिव रेणू कुलकर्णी यांनी आभार मानले.